# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

E-mail : desk4a@dtemaharashtra.gov.in Internet :http//www.dte.org.in


क्रमांक : ४अ/आस्था/२०१८/ ५३८

दिनांक : - 4 AUG 2018

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

विषय :- दिनांक ७,८ व ९ ऑगस्ट, २०१८ रोजी ३ दिवसाच्या राजपत्रिक अधिकाऱ्यांच्या संपाबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र गर्व्हमेंट पॉलिटेक्निक टीचर्स (गॅझेटेड वर्ग -१) वेलफेअर असोसिएशन, कराड यांचे पत्र क्र.एमजीपीटीडब्ल्युए/२०१८/०८/०१, दि.०३/०८/२०१८

महाराष्ट्र राज्यातील शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करणे व इतर प्रलंबित मागण्यांबाबत दिनांक ७,८ व ९ ऑगस्ट, २०१८ रोजी ३ दिवसाचा संपावर जाणार असल्याबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविलेले आहे.

संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, दिनांक ७,८ व ९ ऑगस्ट, २०१८ रोजी होणाऱ्या संपात सहभागी न होण्याबाबत आपल्या अधिपत्यखालील सर्व आस्थापना व संस्थांतील राजपत्रित शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकाऱ्यांना सूचित करण्यात यावे. त्यांनी सदर काळात कर्तव्यावर उपस्थित राहावे. उपरोक्त कार्यकाळात संबंधीतांना कोणत्याही प्रकारची रजा मंजूर केली जाणार नाही व संपात सहभागी झाल्यास काम नाही वेतन नाही या धोरणाची अंमलबजावणी केली जाईल याची जाणीव करुन द्यावी.

तसेच असेही कळविण्यात येते की, सद्यस्थितीत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेचे व त्याअनुषंगिक इतर कामे सुरु असल्याने, तसेच शासनाच्या विविध योजनांची अंतलबजावणी करावयाची असल्याने सदर कामकाजात व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामकाजात कोणतेही बाधा येणार नाही याची व्यवस्था करण्यासंबंधी संबंधीत संस्था प्रमुखांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे. सदर कालावधीत कामकाज सुरळीत चालेल याची दक्षता व व्यवस्था आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.

संपात सहभागी झालेल्या राजपत्रित शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकाऱ्यांची माहिती तात्काळ प्रत्येक दिवशी संचालनालयात विनाविलंब सादर करावी.

सहसंचालक, तंत्रशिक्षण, वि.का. औरंगाबाद
आवक क्र. 7185
दिनांक - 4 AUG 2018

(प्रमोद नाईक)

सहसंचालक,

तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१. मा.सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना सविनय सादर.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई, यांना असेही कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व आस्थापनांना आपल्या स्तरावरुन आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात यावे.
३. प्राचार्य, सर्व शासकीय पदवी व पदविका संस्था
४. अध्यक्ष, महाराष्ट्र गर्व्हमेंट पॉलिटेक्निक टीचर्स (गॅझेटेड वर्ग -१) वेलफेअर असोसिएशन, कराड

---

::महत्त्वाचे::

पृ.पत्र क्र.विकाऔ/आस्था-१/२०१८/ 2122

दिनांक:- 6 AUG 2018

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद.

शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद.

**प्राचार्य**,शासकीय तंत्रनिकेतन,

औरंगाबाद/जालना/अंबड/जिंतूर/हिंगोली/नांदेड/बीड/उस्मानाबाद/पु.ला.शा.तं.लातूर/शा.नि.म.तं.लि.लातूर

**उपसचिव**, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद.

आपणास कळविण्यात येते की,उपरोक्त तंत्रशिक्षण,संचालनालय,महा.राज्य,मुंबई यांच्या पत्रातील निर्देशानुसार कार्यवाही करुन या कार्यालयास अवगत करण्यात यावे.

**प्रत:-या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर व ई-मेल आय-डी उपलब्ध करुन देण्यासाठी**

**सहसंचालक**

**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय**

**औरंगाबाद,**

Indorsment